अथ त्रयोदशोऽध्यायः

तेरावा अध्याय (क्षेत्रक्षत्रज्ञविभागयोग) श्लोक १३-३४

श्रीभगवानुवाच

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते।

एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः || १३-१ ||

अन्वयार्थ

श्रीभगवान = भगवान श्रीकृष्ण, उवाच = म्हणाले, कौन्तेय = हे कौंतेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), इदम् = हे, शरीरम् = शरीर, क्षेत्रम् = क्षेत्र, इति = या शब्दाने, अभिधीयते = सांगितले जाते, (च) = आणि, एतत् = हे, यः = जो, वेत्ति = जाणतो, तम् = त्याला, क्षेत्रज्ञः = क्षेत्रज्ञ, इति = या नावाने, तद्विदः = त्यांचे तत्त्व जाणणारे ज्ञानीजन, प्राहुः = संबोधतात || १३-१ ||

अर्थः-

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे कौंतेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), हे शरीर क्षेत्र या नावाने संबोधिले जाते आणि याला जो जाणतो त्याला, त्याचे तत्त्व जाणणारे ज्ञानी लोक, क्षेत्रज्ञ असे म्हणतात. || १३-१ ||

क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।

क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥ १३-२ ॥

अन्वयार्थ

भारत = हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), सर्वक्षेत्रेषु = सर्व क्षेत्रांमध्ये, क्षेत्रज्ञम् अपि = क्षेत्रज्ञ म्हणजे जीवात्मा सुद्धा, माम् = मीच आहे, (इति) = असे, विद्धि = तू जाण, च = आणि, क्षेत्रक्षेत्रज्ञयोः = क्षेत्र-क्षेत्रज्ञ यांचे म्हणजे विकारांसहित प्रकृतीचे व पुरुषाचे, यत् = जे, ज्ञानम् = तत्त्वतः ज्ञान आहे, तत् = तेच, ज्ञानम् = ज्ञान होय, (इति) = असे, मम = माझे, मतम् = मत आहे ॥ १३-२ ॥

अर्थः-

हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), तू सर्व क्षेत्रांमध्ये क्षेत्रज्ञ अर्थात जीवात्माही मलाच समज आणि क्षेत्र व क्षेत्रज्ञ अर्थात विकारांसहित प्रकृती व पुरुष यांना जे तत्त्वतः जाणणे, ते ज्ञान आहे, असे माझे मत आहे. ॥ १३-२ ॥

तत्क्षेत्रं यच्च यादृक्च यद्विकारि यतश्च यत्।

स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे शृणु॥ १३-३ ॥

अन्वयार्थ

तत् = ते, क्षेत्रम् = क्षेत्र, यत् = जे, च = आणि, यादृक् = जसे आहे, च = तसेच, यद्विकारि = ज्या विकारांनी युक्त आहे, च = तसेच, यतः = ज्या कारणापासून, यत् = जे झाले आहे, च = आणि, सः = तो (क्षेत्रज्ञसुद्धा), यः = जो, च = आणि, यत्प्रभावः = ज्या प्रभावाने युक्त आहे, तत् = ते सर्व, समासेन = संक्षेपाने, मे = माझ्याकडून, शृणु= तू ऐक || १३-३ ||

अर्थः-

ते क्षेत्र जे आणि जसे आहे, तसेच ज्या विकारांनी युक्त आहे आणि ज्या कारणांपासून जे झाले आहे, तसेच तो क्षेत्रज्ञही जो आणि ज्या प्रभावाने युक्त आहे, ते सर्व थोडक्यात माझ्याकडून ऐक. || १३-३ ||

ऋषिभिर्बहुधा गीतं छन्दोभिर्विविधैः पृथक्।

ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः|| १३-४ ||

अन्वयार्थ

(क्षेत्रक्षेत्रज्ञयोः इदम् तत्त्वम्) = क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचे तत्त्व, ऋषिभिः = ऋषींच्याकडून, बहुधा = पुष्कळ प्रकारांनी, गीतम् = सांगितले गेले आहे, (च) = आणि, विविधैः = विविध, छन्दोभिः (अपि) = वेदमंत्रांच्या द्वारा सुद्धा, पृथक् = वेगवेगळेपणाने, (गीतम्) = सांगितले गेले आहे, च = तसेच, विनिश्चितैः =

चांगल्याप्रकारे निश्चित केल्या गेलेल्या, हेतुमद्भिः = युक्तियुक्त अशा, ब्रह्मसूत्रपदैः एव = ब्रह्मसूत्राच्या पदांचे द्वारा सुद्धा, (गीतम्) = सांगितले गेले आहे || १३-४ ||

अर्थ:-

हे क्षेत्र आणि क्षेत्रज्ञाचे तत्त्व ऋषींनी पुष्कळ प्रकारांनी सांगितले आहे आणि निरनिराळ्या वेदमंत्रांतूनही विभागपूर्वक सांगितले गेले आहे. तसेच पूर्णपणे निश्चय केलेल्या युक्तियुक्त ब्रह्मसूत्राच्या पदांनीही सांगितले आहे. || १३-४ ||

महाभूतान्यहङ्कारो बुद्धिरव्यक्तमेव च ।

इन्द्रियाणि दशैकं च पञ्च चेन्द्रियगोचराः || १३-५ ||

अन्वयार्थ

महाभूतानि = पाच महाभूते, अहङ्कारः = अहंकार, बुद्धिः = बुद्धी, च = आणि, अव्यक्तम् एव = मूळ प्रकृती सुद्धा, च = तसेच, दश = दहा, इन्द्रियाणि = इंद्रिये, एकम् (मनः) = एक मन, च = तसेच, पञ्च = पाच, इन्द्रियगोचराः = इंद्रियांचे विषय म्हणजे शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध || १३-५ ||

अर्थ:-

पाच महाभूते, अहंकार, बुद्धी आणि मूळ प्रकृती तसेच दहा इंद्रिये, एक मन आणि पाच इंद्रियांचे विषय अर्थात शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध || १३-५ ||

इच्छा द्वेषः सुखं दुःखं सङ्घातश्चेतना धृतिः ।

एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् || १३-६ ||

अन्वयार्थ

इच्छाः = इच्छा, द्वेषः = द्वेष, सुखम् = सुख, दुःखम् = दुःख, सङ्घातः = स्थूल देहाचा पिंड, चेतना = चेतना, (च) = आणि, धृतिः = धृती, (एवम्) = अशा प्रकारे, सविकारम् = विकारांचे सह, एतत् = हे, क्षेत्रम् = क्षेत्र, समासेन = संक्षेपाने, उदाहृतम् = सांगितले गेले आहे || १३-६ ||

अर्थः-

तसेच इच्छा, द्वेष, सुख, दुःख, स्थूल देहाचा पिंड, चेतना आणि धृती अशा प्रकारे विकारांसहित हे क्षेत्र थोडक्यात सांगितले गेले आहे. || १३-६ ||

अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् ।

आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः || १३-७ ||

अन्वयार्थ

अमानित्वम् = श्रेष्ठतेच्या अभिमानाचा अभाव, अदम्भित्वम् = दंभाचराणाचा अभाव, अहिंसा = कोणत्याही सजीवाला कोणत्याही प्रकाराने न सतावणे, क्षान्तिः = क्षमाभाव, आर्जवम् = मन, वाणी इत्यादींचा सरळपणा, आचार्योपासनम् = गुरूंची श्रद्धाभक्तिसहित सेवा, शौचम् = आत-बाहेरची शुद्धी, स्थैर्यम् = अंतःकरणाची स्थिरता, (च) = आणि, आत्मविनिग्रहः = मन व इंद्रिये यांच्यासह शरीराचा निग्रह ॥ १३-७ ॥

अर्थः-

मोठेपणाचा अभिमान नसणे, ढोंग न करणे, कोणत्याही सजीवाला कोणत्याही प्रकारे त्रास न देणे, क्षमा करणे, मन, वाणी इत्यादींबाबत सरळपणा, श्रद्धा व भक्तीसह गुरूंची सेवा, अंतर्बाह्य शुद्धी, अंतःकरणाची स्थिरता आणि मन व इंद्रियांसह शरीराचा निग्रह ॥ १३-७ ॥

इन्द्रियार्थेषु वैराग्यमनहङ्कार एव च ।

जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम्॥ १३-८ ॥

अन्वयार्थ

इन्द्रियार्थेषु = हा लोक व परलोक यांतील संपूर्ण भोगांमध्ये, वैराग्यम् = आसक्तीचा अभाव, च = आणि, अनहङ्कारः एव = अहंकाराचा सुद्धा अभाव, जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम्= जन्म, मृत्यू जरा आणि रोग इत्यादींच्या बाबतीत दुःख आणि दोष आहेत असा वारंवार विचार करणे ॥ १३-८ ॥

अर्थः-

इह व पर लोकांतील सर्व विषयांच्या उपभोगाविषयी आसक्ती नसणे आणि अहंकारही नसणे, जन्म, मृत्यू वृद्धत्व आणि रोग इत्यादींमध्ये दुःख व दोषांचा वारंवार विचार करणे ॥ १३-८ ॥

असक्तिरनभिष्वङ्गः पुत्रदारगृहादिषु।

नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ॥ १३-९ ॥

अन्वयार्थ

पुत्रदारगृहादिषु = पुत्र, स्त्री, घर आणि धन इत्यादींच्या ठिकाणी, असक्तिः = आसक्तीचा अभाव, अनभिष्वङ्गः = ममता नसणे, च = तसेच, इष्टानिष्टोपपत्तिषु = प्रिय आणि अप्रिय यांची प्राप्ती झाली असता, नित्यम् = सदाच, समचित्तत्वम् = चित्त सम असणे ॥ १३-९ ॥

अर्थः-

पुत्र, स्त्री, घर आणि धन इत्यादींची आसक्ती नसणे व ममता नसणे तसेच आवडती आणि नावडती गोष्ट घडली असता नेहमीच चित्त समतोल ठेवणे ॥ १३-९ ॥

मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ।

विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि॥ १३-१० ॥

अन्वयार्थ

अनन्ययोगेन = अनन्य योगाच्या द्वारा, मयि = मज परमात्म्याच्या ठायी, अव्यभिचारिणी = एकनिष्ठ, भक्तिः = भक्ती, च = तसेच, विविक्त देश सेवित्वम् = एकांतात व शुद्ध प्रदेशात राहाण्याचा स्वभाव, (च) = आणि, जनसंसदि = विषयासक्त मनुष्यांच्या समुदायामध्ये, अरतिः = प्रेम नसणे ॥ १३-१० ॥

अर्थः-

मज परमेश्वरामध्ये अनन्य योगाने अव्यभिचारिणी भक्ती, तसेच एकान्तात शुद्ध ठिकाणी राहण्याचा स्वभाव आणि विषयासक्त मनुष्यांच्या सहवासाची आवड नसणे ॥ १३-१० ॥

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।

एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा || १३-११ ||

अन्वयार्थ

अध्यात्मज्ञाननित्यत्वम् = अध्यात्म ज्ञानामध्ये नित्य स्थिती, (च) = आणि, तत्त्वज्ञानार्थदर्शनम् = तत्त्वज्ञानाचा अर्थः-रूप असा जो परमात्मा त्यालाच पाहणे, एतत् = हे सर्व, ज्ञानम् = ज्ञान आहे, अतः = यापेक्षा, यत् = जे, अन्यथा = विपरीत आहे, तत् = ते, अज्ञानम् = अज्ञान आहे, इति = असे, प्रोक्तम् = म्हटलेले आहे || १३-११ ||

अर्थः-

अध्यात्मज्ञानात नित्य स्थिती आणि तत्त्वज्ञानाचा अर्थः- जो परमात्मा त्यालाच पाहणे, हे सर्व ज्ञान होय, आणि याउलट जे असेल, ते अज्ञान होय, असे म्हटले आहे. || १३-११ ||

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वामृतमश्नुते|

अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते|| १३-१२ ||

अन्वयार्थ

यत् ज्ञेयम् = जे जाणण्यास योग्य आहे, (तथा) = तसेच, यत् = जे, ज्ञात्वा = जाणल्यावर, (मनुष्यः) = मनुष्य, अमृतम् = परमानंद, अश्नुते = प्राप्त करून घेतो, तत् = ते, प्रवक्ष्यामि = मी

चांगल्याप्रकारे सांगेन, अनादिमत् = अनादी असणाऱ्या, तत् = त्या, परम् ब्रह्म = परम ब्रह्माला, न सत् उच्यते = सत् असेही म्हणता येत नाही, (च) = आणि, न असत् (उच्यते) = असत् ही म्हणता येत नाही || १३-१२ ||

अर्थः-

जे जाणण्याजोगे आहे आणि जे जाणल्यामुळे मनुष्याला परम आनंद मिळतो, ते चांगल्या प्रकारे सांगतो. ते अनादी परम ब्रह्म सत् ही म्हणता येत नाही आणि असत् ही म्हणता येत नाही || १३-१२ ||

सर्वतःपाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् |

सर्वतःश्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति || १३-१३ ||

अन्वयार्थ

सर्वतःपाणिपादम् = सर्व बाजूंनी हात-पाय असणारे, सर्वतोऽक्षिशिरोमुखम् = सर्व बाजूंना डोळे, डोके आणि मुखे असणारे, (तथा) = तसेच, सर्वतःश्रुतिमत् = सर्व बाजूंनी कान असणारे असे, तत् = ते आहे, (यतः) = कारण, (तत्) = ते, लोके = या संसारात, सर्वम् आवृत्य = सर्वांना व्यापून, तिष्ठति = स्थित आहे || १३-१३ ||

अर्थः-

ते सर्व बाजूंनी हात-पाय असलेले, सर्व बाजूंनी डोळे, डोकी व तोंडे असलेले, तसेच सर्व बाजूंनी कान असलेले आहे. कारण ते विश्वात सर्वाला व्यापून राहिले आहे. ॥ १३-१३ ॥

सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम्।

असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥ १३-१४ ॥

अन्वयार्थ

(तत्) = ते, सर्वेन्द्रियगुणाभासम् = संपूर्ण इंद्रियांच्या विषयांना जाणणारे आहे, (परंतु) = परंतु वास्तवात, सर्वेन्द्रियविवर्जितम् = सर्व इंद्रियांनी रहित आहे, च = तसेच, असक्तम् एव = आसक्तिरहित असूनही, सर्वभृत् = सर्वांचे धारण-पोषण करणारे, च = आणि, निर्गुणम् = निर्गुण असूनसुद्धा, गुणभोक्तृ = गुणांचा भोग घेणारे आहे ॥ १३-१४ ॥

अर्थः-

ते सर्व इंद्रियांच्या विषयांना जाणणारे आहे. परंतु वास्तविक सर्व इंद्रियांनी रहित आहे. ते आसक्तिरहित असूनही सर्वांचे धारण-पोषण करणारे आणि निर्गुण असूनही गुणांचा भोग घेणारे आहे. ॥ १३-१४ ॥

बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च ।

सूक्ष्मात्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत् || १३-१५ ||

अन्वयार्थ

(तत्) = ते, भूतानाम् = चराचर सर्व प्राण्यांमध्ये, बहिः अन्तः = आत-बाहेर व्याप्त आहे, च = आणि, (तत्) = ते, चरम् अचरम् एव = चर-रूप आणि अचर-रूप सुद्धा आहे, च = आणि, तत् = ते, सूक्ष्मात्वात् = सूक्ष्म असल्यामुळे, अविज्ञेयम् = अविज्ञेय आहे, च = तसेच, अन्तिके = अतिजवळ, च = आणि, दूरस्थम् = दूर सुद्धा, तत् = तेच आहे || १३-१५ ||

अर्थः-

ते चराचर सर्व प्राणिमात्रांच्या बाहेर व आत परिपूर्ण भरले आहे. तसेच चर आणि अचरही तेच आहे आणि ते सूक्ष्म असल्यामुळे कळण्याजोगे नाही. तसेच अतिशय जवळ आणि दूरही असलेले तेच आहे. || १३-१५ ||

अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम् ।

भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च || १३-१६ ||

अन्वयार्थ

(तत्) = ते, अविभक्तम् च = विभागरहित, एकाच रूपाने आकाशाप्रमाणे परिपूर्ण असूनही, भूतेषु = संपूर्ण चराचर भूतांमध्ये, विभक्तम् इव = विभक्त असल्याप्रमाणे, स्थितम् = स्थित आहे म्हणजे तसे प्रतीत होते, च = तसेच, तत् = तो, ज्ञेयम् = जाणण्यास योग्य असा परमात्मा, प्रभविष्णु = ब्रह्मदेवाच्या रूपाने सर्वांना उत्पन्न करणारा आहे, च = तसेच, भूतभर्तृ = विष्णुरूपाने भूतांचे धारण-पोषण करणारा आहे, च = आणि, ग्रसिष्णु = रुद्ररूपाने संहार करणार आहे ॥ १३-१६ ॥

अर्थ:-

तो परमात्मा विभागरहित एकरूप असा आकाशासारखा परिपूर्ण असूनही चराचर संपूर्ण भूतांमध्ये वेगवेगळा असल्यासारखा भासत आहे. तसाच तो जाणण्याजोगा परमात्मा विष्णुरूपाने भूतांचे धारणपोषण करणारा, रुद्ररूपाने संहार करणारा आणि ब्रह्मदेवरूपाने सर्वांना उत्पन्न करणारा आहे. ॥ १३-१६ ॥

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते।

ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम् ॥ १३-१७ ॥

अन्वयार्थ

तत् = ते परब्रह्म, ज्योतिषाम् अपि = ज्योतींची सुद्धा, ज्योतिः = ज्योती आहे, (एवम्) = तसेच, तमसः = मायेच्या, परम् = अत्यंत पलीकडे आहे, (इति) = असे, उच्यते = म्हटले जाते, (तत्) = परमात्मा, ज्ञानम् = बोधस्वरूप, ज्ञेयम् = जाणण्यास योग्य, (च) = आणि, ज्ञानगम्यम् = तत्त्वज्ञानाने प्राप्त करून घेण्यास योग्य आहे, (तथा) = तसेच, सर्वस्य = सर्वांच्या, हृदि = हृदयात, विष्ठितम् = विशेषरूपाने स्थित आहे || १३-१७ ||

अर्थः-

ते परब्रह्म ज्योतींची ज्योत आणि मायेच्या अत्यंत पलीकडे म्हटले जाते. तो परमात्मा ज्ञानस्वरूप, जाणण्यास योग्य आणि तत्त्वज्ञानाने प्राप्त होण्याजोगा आहे. तसेच सर्वांच्या हृदयात विशेषरूपाने राहिलेला आहे. || १३-१७ ||

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः ।

मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते || १३-१८ ||

अन्वयार्थ

इति = अशाप्रकारे, क्षेत्रम् = क्षेत्र, तथा = तसेच, ज्ञानम् = ज्ञान, च = आणि, ज्ञेयम् = जाणण्यास योग्य असे परमात्म्याचे स्वरूप, समासतः = संक्षेपाने, उक्तम् = सांगितले आहे, एतत् =

हे, विज्ञाय = तत्त्वतः जाणून, मद्भक्तः = माझा भक्त, मद्भावाय = माझ्या स्वरूपाला, उपपद्यते = प्राप्त करून घेतो || १३-१८ ||

अर्थः-

अशाप्रकारे क्षेत्र तसेच ज्ञान आणि जाणण्याजोगे परमात्म्याचे स्वरूप थोडक्यात सांगितले. माझा भक्त हे तत्त्वतः जाणून माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो. || १३-१८ ||

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि |

विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसम्भवान् || १३-१९ ||

अन्वयार्थ

प्रकृतिम् = प्रकृती, पुरुषम् = पुरुष, उभौ एव = हे दोघेही, अनादी = अनादी, (इति) = असे, विद्धि = तू जाण, च = आणि, विकारान् = रागद्वेषादी विकार, च = तसेच, गुणान् अपि = त्रिगुणात्मक संपूर्ण पदार्थ हे सुद्धा, प्रकृतिसम्भवान् एव = प्रकृतीपासून उत्पन्न झालेले आहेत असे, विद्धि = तू जाण || १३-१९ ||

अर्थः-

प्रकृती आणि पुरुष हे दोन्हीही अनादी आहेत, असे तू समज आणि राग-द्वेषादी विकार तसेच त्रिगुणात्मक सर्व पदार्थही प्रकृतीपासूनच उत्पन्न झालेले आहेत, असे समज. || १३-१९ ||

कार्यकरणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ।

पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते || १३-२० ||

अन्वयार्थ

प्रकृतिः = प्रकृती ही, कार्यकरणकर्तृत्वे= कार्य आणि करण यांना उत्पन्न करण्यात, हेतुः = हेतू आहे, इति = असे, उच्यते = म्हटली जाते, (च) = आणि, सुखदुःखानाम् = सुखदुःखे, भोक्तृत्वे = भोगण्यामध्ये, पुरुषः = जीवात्मा हा, हेतुः = हेतू आहे, (इति) = असे, उच्यते = म्हटले जाते || १३-२० ||

अर्थः-

कार्य व करण यांच्या उत्पत्तीचे कारण प्रकृती म्हटली जाते आणि जीवात्मा सुखदुःखांच्या भोगण्याला कारण म्हटला जातो. || १३-२० ||

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान् ।

कारणं गुणसङ्गोऽस्य सदसद्योनिजन्मसु || १३-२१ ||

अन्वयार्थ

प्रकृतिस्थः हि = प्रकृतीमध्ये स्थित असणाराच, पुरुषः = पुरुष हा, प्रकृतिजान् = प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या, गुणान् = त्रिगुणात्मक पदार्थांचा, भुङ्क्ते = उपभोग घेतो, (च) = आणि, गुणसङ्गः एव = या गुणांचा संगच, अस्य = या जीवात्म्याच्या, सदसद्योनिजन्मसु = बऱ्या-वाईट योनींमध्ये जन्म घेण्याचे, कारणम् = कारण आहे || १३-२१ ||

अर्थः-

प्रकृतीत राहिलेला पुरुष प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या त्रिगुणात्मक पदार्थांना भोगतो आणि या गुणांची संगतीच या जीवात्म्याला बऱ्या-वाईट योनींत जन्म मिळण्याला कारण आहे. || १३-२१ ||

उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः |

परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषःपरः || १३-२२ ||

अन्वयार्थ

अस्मिन् देहे (स्थितः) अपि पुरुषः = या देहामध्ये स्थित असतानाही आत्मा हा वास्तवात, परः (एव) = परमात्माच आहे, (सः एव) = तोच, उपद्रष्टा = साक्षी असल्यामुळे उपद्रष्टा, च =

आणि, अनुमन्ता = यथार्थ संमती देणारा असल्यामुळे अनुमंता, भर्ता = सर्वांचे धारण-पोषण करणारा असल्यामुळे भर्ता, भोक्ता = जीवरूपाने भोक्ता, महेश्वरः = ब्रह्मदेव इत्यादींचा सुद्धा ईश्वर असल्याने महेश्वर, च = आणि, परमात्मा = शुद्ध सच्चिदानंदघन असल्याने परमात्मा आहे, इति = असे, उक्तः = म्हटले गेले आहे ॥ १३-२२ ॥

अर्थः-

या देहात असलेला आत्मा वास्तविक परमात्माच आहे. तोच साक्षी असल्यामुळे उपद्रष्टा आणि खरी संमती देणारा असल्याने अनुमंता, सर्वांचे धारण-पोषण करणारा म्हणून भर्ता, जीवरूपाने भोक्ता, ब्रह्मदेव इत्यादींचाही स्वामी असल्याने महेश्वर आणि शुद्ध सच्चिदानंदघन असल्यामुळे परमात्मा म्हटला जातो. ॥ १३-२२ ॥

य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैःसह ।

सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते ॥ १३-२३ ॥

अन्वयार्थ

एवम् = अशाप्रकारे, पुरुषम् = पुरुष, च = आणि, गुणैः सह = गुणांसहित, प्रकृतिम् = प्रकृती, यः = यांना जो मनुष्य, वेत्ति = तत्त्वतः जाणतो, सः = तो, सर्वथा = सर्व प्रकारांनी, वर्तमानः

अपि = कर्तव्य कर्म करीत असतानासुद्धा, भूयः = पुन्हा, न अभिजायते = जन्माला येत नाही || १३-२३ ||

अर्थः-

अशा रीतीने पुरुषाला आणि गुणांसहित प्रकृतीला जो मनुष्य तत्त्वतः जाणतो, तो सर्व प्रकारे कर्तव्य कर्मे करीत असला तरी पुन्हा जन्माला येत नाही. || १३-२३ ||

ध्यानेनात्मनि पश्यन्ति केचिदात्मानमात्मना ।

अन्ये साङ्ख्येन योगेन कर्मयोगेन चापरे || १३-२४ ||

अन्वयार्थ

आत्मना = शुद्ध झालेल्या सूक्ष्म बुद्धीने, ध्यानेन = ध्यानाच्या द्वारा, केचित् = काही माणसे, आत्मनि = हृदयात, आत्मानम् = परमात्म्याला, पश्यन्ति = पाहातात, अन्ये = इतर काहीजण, साङ्ख्येन योगेन = ज्ञानयोगाच्या द्वारा, च = आणि, अपरे = दुसरे कित्येक, कर्मयोगेन = कर्मयोगाच्या द्वारा, (आत्मानम् पश्यन्ति) = परमात्म्याला पाहतात म्हणजे परमात्म्याला प्राप्त करून घेतात || १३-२४ ||

अर्थः-

त्या परमात्म्याला काहीजण शुद्ध झालेल्या सूक्ष्म बुद्धीने ध्यानाच्या योगाने हृदयात पाहातात. दुसरे काहीजण ज्ञानयोगाच्या द्वारा आणि इतर कितीतरी लोक कर्मयोगाच्या द्वारा पाहातात म्हणजेच प्राप्त करून घेतात. || १३-२४ ||

अन्ये त्वेवमजानन्तः श्रुत्वान्येभ्य उपासते ।

तेऽपि चातितरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणाः || १३-२५ ||

अन्वयार्थ

तु = परंतु, एवम् = अशाप्रकारे, अजानन्तः = न जाणता, अन्ये = जे मंद बुद्धीचे पुरुष आहेत ते, अन्येभ्यः = दुसऱ्यांच्याकडून म्हणजे तत्त्व जाणणाऱ्या पुरुषांकडून, श्रुत्वा = ऐकूनच तदनुसार, उपासते = उपासना करतात, च = आणि, ते = ते, श्रुतिपरायणाः = श्रवण परायण असे पुरुष, अपि = सुद्धा, मृत्युम् = मृत्युरूपसंसारसागर, अतितरन्ति एव = निःसंदेहपणे तरून जातात || १३-२५ ||

अर्थः-

परंतु यांखेरीज इतर अर्थात मंदबुद्धीचे पुरुष आहेत, ते अशाप्रकारे न जाणणारे असतात. ते दुसऱ्यांकडून म्हणजेच तत्त्वज्ञानी पुरुषांकडून ऐकूनच तदनुसार उपासना करतात

आणि ते ऐकलेले प्रमाण मानणारे पुरुषसुद्धा मृत्युरूप संसारसागर खात्रीने तरून जातात. || १३-२५ ||

यावत्सञ्जायते किञ्चित्सत्त्वं स्थावरजङ्गमम् ।

क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ || १३-२६ ||

अन्वयार्थ

भरतर्षभ = हे भरतर्षभा (अर्थात भरतवंशीयांमध्ये श्रेष्ठ अर्जुना), यावत् किञ्चित् = जितके म्हणून, स्थावरजङ्गमम् = स्थावरजंगम असे, सत्त्वम् = प्राणी, सञ्जायते = उत्पन्न होतात, तत् = ते सर्व, क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात् = क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगामुळे उत्पन्न होतात, (इति) = असे, विद्धि = तू जाण || १३-२६ ||

अर्थ:-

हे भरतर्षभा (अर्थात भरतवंशीयांमध्ये श्रेष्ठ अर्जुना), जेवढे म्हणून स्थावर-जंगम प्राणी उत्पन्न होतात, ते सर्व क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगानेच उत्पन्न होतात, असे तू जाण. || १३-२६ ||

समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम् ।

विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति || १३-२७ ||

अन्वयार्थ

विनश्यत्सु = नष्ट होणाऱ्या, सर्वेषु = सर्व, भूतेषु = चराचर भूतांमध्ये, परमेश्वरम् = परमेश्वराला, यः = जो, अविनश्यन्तम् = नाशरहित, (च) = आणि, समम् = समभावाने, तिष्ठन्तम् = स्थित असे, पश्यति = पाहतो, सः (एव) = तोच, पश्यति = यथार्थ पाहातो ॥ १३-२७ ॥

अर्थः-

जो पुरुष नाशिवंत सर्व चराचर भूतांत परमेश्वर हा अविनाशी व सर्वत्र समभावाने स्थित असलेला पाहतो, तोच खरे पाहतो. ॥ १३-२७ ॥

समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।

न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ॥ १३-२८ ॥

अन्वयार्थ

हि = कारण, (यः पुरुषः) = जो पुरुष, सर्वत्र = सर्वांमध्ये, समवस्थितम् = समभावाने स्थित असणाऱ्या, ईश्वरम् = परमेश्वराला, समम् = समानपणे, पश्यन् = पाहतो, (सः) = तो, आत्मना = आपल्याद्वारा, आत्मानम् = आपल्याला, न हिनस्ति

= नष्ट करीत नाही, ततः = त्यामुळे, (सः) = तो, पराम् = परम, गतिम् = गतीला, याति = प्राप्त होतो || १३-२८ ||

अर्थः-

कारण जो पुरुष सर्वांमध्ये समरूपाने असलेल्या परमेश्वराला समान पाहून आपणच आपला नाश करून घेत नाही, त्यामुळे तो परम गतीला जातो. || १३-२८ ||

प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः |

यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति || १३-२९ ||

अन्वयार्थ

च = आणि, सर्वशः = सर्व प्रकारांनी, कर्माणि = सर्व कर्मे ही, प्रकृत्या एव = प्रकृतीच्या द्वाराच, क्रियमाणानि = केली जातात असे, यः = जो पुरुष, पश्यति = पाहतो, तथा = तसेच, आत्मानम् = आत्म्याला, अकर्तारम् = अकर्ता असे, पश्यति = पाहतो, सः = तोच, (पश्यति) = यथार्थपणे पाहतो || १३-२९ ||

अर्थः-

आणि जो पुरुष सर्व कर्मे सर्व प्रकारे प्रकृतीकडून केली जाणारी आहेत, असे पाहतो आणि आत्मा अकर्ता आहे, असे पाहतो, तोच खरा पाहतो. || १३-२९ ||

यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति।

तत एव च विस्तारं ब्रह्म सम्पद्यते तदा ॥ १३-३० ॥

अन्वयार्थ

यदा = ज्या क्षणी, (अयम् पुरुषः) = हा पुरुष, भूतपृथग्भावम्= भूतांचे वेगवेगळे भाव हे, एकस्थम् = एकाच परमात्म्यामध्ये स्थित आहेत, च = तसेच, ततः एव = त्या परमात्म्यापासूनच, विस्तारम् = संपूर्ण भूतांचा विस्तार आहे असे, अनुपश्यति = पाहतो, तदा = त्याच क्षणी, (सः) = तो, ब्रह्म = सच्चिदानंदघन ब्रह्म, सम्पद्यते = प्राप्त करून घेतो ॥ १३-३० ॥

अर्थः-

ज्या क्षणी हा पुरुष भूतांचे निरनिराळे भाव एका परमात्म्यातच असलेले आणि त्या परमात्म्यापासूनच सर्व भूतांचा विस्तार आहे, असे पाहतो, त्याच क्षणी तो सच्चिदानंदघन ब्रह्माला प्राप्त होतो. ॥ १३-३० ॥

अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः।

शरीरस्थोऽपि कौन्तेय न करोति न लिप्यते ॥ १३-३१ ॥

अन्वयार्थ

कौन्तेय = हे कौंतेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), अनादित्वात् = अनादी असल्यामुळे, (च) = आणि, निर्गुणत्वात् = निर्गुण असल्यामुळे, अयम् = हा, अव्ययः = अविनाशी, परमात्मा = परमात्मा, शरीरस्थः अपि = शरीरात स्थिर असूनसुद्धा, न करोति = वास्तवात काही करतही नाही, (च) = तसेच, न लिप्यते = लिप्तही होत नाही || १३-३१ ||

अर्थः-

हे कौंतेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), हा अविनाशी परमात्मा अनादी आणि निर्गुण असल्यामुळे शरीरात राहात असूनही वास्तविक तो काही करीत नाही आणि लिप्त होत नाही. || १३-३१ ||

यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते ।

सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते || १३-३२ ||

अन्वयार्थ

यथा = ज्याप्रमाणे, सर्वगतम् = सर्वत्र व्याप्त असणारे, आकाशम् = आकाश हे, सौक्ष्म्यात् = सूक्ष्म असल्याकारणाने, न उपलिप्यते = लिप्त होत नाही, तथा = त्याप्रमाणे, देहे = देहामध्ये, सर्वत्र = सर्वत्र, अवस्थितः = स्थित असलेला, आत्मा

= आत्मा हा (निर्गुण असल्यामुळे), न उपलिप्यते = देहाच्या गुणांनी लिप्त होत नाही || १३-३२ ||

अर्थः-

ज्याप्रमाणे सर्वत्र व्यापलेले आकाश सूक्ष्म असल्याकारणाने लिप्त होत नाही त्याचप्रमाणे देहात सर्वत्र व्यापून असलेला आत्मा निर्गुण असल्याकारणाने देहाच्या गुणांनी लिप्त होत नाही. || १३-३२ ||

यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः ।

क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत || १३-३३ ||

अन्वयार्थ

भारत = हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), यथा = ज्याप्रमाणे, एकः = एकच, रविः = सूर्य, इमम् = या, कृत्स्नम् = संपूर्ण, लोकम् = ब्रह्मांडाला, प्रकाशयति = प्रकाशित करतो, तथा = त्याप्रमाणे, क्षेत्री = एकच आत्मा, कृत्स्नम् = संपूर्ण, क्षेत्रम् = क्षेत्राला, प्रकाशयति = प्रकाशित करतो || १३-३३ ||

अर्थः-

हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), ज्याप्रमाणे एकच सूर्य या संपूर्ण ब्रह्मांडाला प्रकाशित करतो, त्याचप्रमाणे एकच आत्मा संपूर्ण क्षेत्राला प्रकाशित करतो. || १३-३३ ||

क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा।

भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम् || १३-३४ ||

अन्वयार्थ

एवम् = अशाप्रकारे, क्षेत्रक्षेत्रज्ञयोः = क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांतील, अन्तरम् = भेद, च = आणि, भूतप्रकृतिमोक्षम् = कार्यासहित प्रकृतीपासून सुटका (या गोष्टी), ये = जे पुरुष, ज्ञानचक्षुषा = ज्ञानरूपी नेत्रांचे द्वारा, विदुः = तत्त्वतः जाणतात, ते = ते महात्मा जन, परम् = परम ब्रह्म परमात्म्याला, यान्ति = प्राप्त करून घेतात || १३-३४ ||

अर्थः-

अशा प्रकारे क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांतील भेद तसेच कार्यासह प्रकृतीपासून मुक्त होण्याचा मार्ग ज्ञानदृष्टीने जे पुरुष तत्त्वतः जाणतात, ते महात्मे परब्रह्म परमात्म्याला प्राप्त होतात. || १३-३४ ||

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे

क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग नाम त्रयोदशोऽध्यायः || १३ ||

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्भगवद्गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग नावाचा हा तेरावा अध्याय समाप्त झाला. || १३ ||